# रस्त्यांच्या दळणवळणाच्या निर्मितीत डॉ. अनिलकुमार गायकवाड यांचे महत्त्वपूर्ण योगदान!

## शिवसेना उपनेते शिवाजीराव आढळराव पाटील





**सुनील भोर, रांजणी**

राज्यातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या जडण - घडणीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे . दळण - वळणाच्या धमन्यांचा निर्माता म्हणून गायकवाड यांच्या कार्यकाळात रस्ते विकासाची झालेली अनेक आव्हानात्मक कामे , शासकीय अधिकाऱ्यांबरोबरच जनतेच्या कायमच लक्षात राहतील असे गौरवोद् गार शिवसेनेचे उपनेते माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी काढले.

आंबेगाव तालुक्यातील जाधववाडी ग्रामस्थांच्या वतीने नुकताच रस्ते विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी डॉ.अनिलकुमार गायकवाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा नागरी सन्मान करण्यात आला. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात शिवसेनेचे उपनेते शिवाजीराव आढळराव पाटील बोलत होते . यावेळी जुन्नरचे आमदार अतुल बेनके, पूर्वा दिलीप वळसे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयराव कोलते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष गणपतराव फुलवडे, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पाटील, शरद सहकारी बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे माजी सभापती मंगलदास बांदल, ज्येष्ठ पत्रकार विशाल परदेशी , स्त्रीरोग तज्ञ डॉ. मोहन साळी , हृदयरोग तज्ञ डॉ.हर्षद शेटे, शिवाजीराव ढोबळे, ज्येष्ठ उद्योजक रतनभाई चोईथानी, उद्योजक सोपान बेल्हेकर, महाराष्ट्र राज्य नवनिर्माण सेनेचे राज्याचे उपाध्यक्ष गणपतराव महाले, आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. विष्णू हिंगे पाटील, ज्येष्ठ पत्रकार डि. के.वळसे पाटील, उद्योजक संतोष चाकणकर, अमित कुदळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता प्रशांत पाटील, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडुसरकर, उपअभियंता जी.एस. कोकणे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित जनसमुदायाला उद्देशून बोलताना शिवसेना उपनेते आढळराव पाटील म्हणाले, गेली 43 वर्ष डॉ.अनिलकुमार गायकवाड यांनी शासकीय सेवा करत असताना राज्यातील अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प मागी लावले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने देशातील महत्त्वाचा असा मुंबई - नागपूर हा समृद्धी महामार्ग तयार करण्यात डॉ.गायकवाड यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. तर नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन बांधकामातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यकालात सध्या रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून पुण्यातील रिंग रोड आणि मुंबई - पुणे महामार्गावरील मिसिंग लिंक रोड आदी महत्वाचे अवघड प्रकल्प प्रगतीपथावर असून सदर प्रकल्प डॉ. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पूर्ण होतील असा विश्वास आढळराव पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

आढळराव पाटील पुढे म्हणाले गुणवत्ता प्रामाणिकपणा आणि वक्तशीरपणा हे डॉ. अनिलकुमार गायकवाड यांच्या यशस्वीतेचं त्रिसूत्री असून त्यांच्या कुशाग्र बुद्धीच्या जोरावर त्यांनी राज्यातील अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प लिलया पूर्णत्वास नेले.राज्य शासनाने डॉ. अनिलकुमार गायकवाड यांची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय पदी केलेली नेमणूक ही सार्थ असून त्या पदाला ते प्रामाणिकपणे आणि खऱ्या अर्थाने न्याय देतील असा विश्वास आढळराव यांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना डॉ अनिल कुमार गायकवाड म्हणाले जाधववाडी सारख्या ग्रामीण भागात माझा नागरिक सन्मान होणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे शासकीय काम करत असताना अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागले परंतु शासनाचे प्रामाणिकपणे काम करायचे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून अवघड आणि महत्त्वपूर्ण प्रकल्प माझ्या कार्यकाळात पूर्ण झाल्याचा मला अभिमान आहे ते पुढे म्हणाले ध्येयाने प्रेरित होऊन माणूस कुठेच यशस्वी होत नाही तो यशस्वी होतो .प्रतिकूल परिस्थिती मधून जी व्यक्ती यशापर्यंतचा प्रवास करते ती व्यक्ती सर्वांसाठी एक मार्गदर्शक असते . दृढनिश्चय आणि योग्य मूल्यांसह प्रतिकूल परिस्थितीतून आलेली व्यक्ती आव्हानांवर मात करू शकते असे ठाम मत डॉ .गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रम प्रसंगी आमदार अतुल बेनके, पुर्वा दिलीप वळसे पाटील, पुणे जिल्हा बांधकाम समितीचे माजी सभापती मंगलदास बांदल, जेष्ठ पत्रकार विशाल परदेशी, डि.के. वळसे पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक चेतन जाधव यांनी केले तर आभार वरिष्ठ पत्रकार रमेश जाधव यांनी मानले.

# इंदिरा नगर वस्तीतील नागरिकांचा एल्गार

## बागलाण पंचायत समिती समोर 'आमरण उपोषण' सुरु



**सटाणा :** बागलाण तालुक्यातील दऱ्हाने ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या सटाणा महाविद्यालयाजवळी इंदिरा नगर वस्तीतील असंख्य नागरिकांना आजही मुलभूत सुविधांसाठी लढावे लागत आहे.

या वस्तीतील असंख्य नागरिकांना पाणी, वीज, घरकुल मिळाले नाही, ज्यांना मिळते त्यांच्याकडून बेकायदेशीररित्या अवाजवी रकम वसूल केली जात आहे. दऱ्हाने गावात सुरु असणाऱ्या जलजीन योजनेतील कामात अनेक शासकीय नियमांचा भंग आणि आथीक बेशीस्त दिसून येत असल्याच्या कारणावरुन येथिल सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र सुर्यवंशी आणि प्रशांत सोनवणे या युवकांनी दि. १५ जानेवारी पासून बागलाण पंचायत समिती समोर 'आमरण उपोषण' सुरु केले आहे.

नागरिकांना तात्काळ त्यांच्या नागरीसुविधा शासकीय नियमानुसार प्रदान करण्यात याव्यात, विकास कामांमधिल अनियमता, बेकायदेशीर कामे, आर्थिक बेशिस्त यांबरोबरच तालुक्यातील बहुसंख्य ग्रामपंचातींमध्ये ग्रामसेवक आणि विद्यमान ग्रामपंचायत समिती ही सालेलोटे करुन अनेक बाबींमध्ये संशयास्पद कारभार करतात; तसेच बऱ्याच गावांमधिल ग्रामसेवक दैनंदिनरित्या कार्यालयात-कार्यक्षेत्रात हजर राहत नाहीत, यांसारख्या उपस्थित केलेल्या विषयांकडे शासनाने तातडीने गांभीर्याने लक्ष देत दोषींविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

# ज्ञानज्योत इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' उपक्रमास प्रारंभ



**देहुगांव :** शाळा मराठी मिडीयम असो अथवा इंग्रजी मिडीयम. प्रत्येक शाळेचा एकच ध्यास मुलांना चांगले संस्कार देणे, एक आदर्श नागरिक बनविणे. याच उद्दात हेतूने ग्यानज्योत इंग्लिश मिडियम स्कूल मध्ये 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' उपक्रमास प्रारंभ झाला.

या प्रसंगी ह. भ. प. सुभाष महाराज गेटे, ह. भ. प. नरहरी महाराज चौधरी, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे, राजेंद्र विठ्ठलराव घुंडरे (अध्यक्ष ज्ञान ज्योत इंग्लिश मीडियम स्कूल), ह. भ. प. नरहरी महाराज सांगळे, ह. भ. प. वासुदेव महाराज शेवाळे, श्रीधर घुंडरे, विलास वाघमारे, ज्ञानेश्वर जाधव, विश्वंभर पाटील, सुभाष दाभाडे, शिवसेना शहराध्यक्ष राहुल चव्हाण, चंद्रकांत गोरे, मुख्याध्यापिका प्रीती उंबरकर, विजय धादवड, कैलास आव्हाळे आदी उपस्थित होते.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने २० ज्ञानेश्वरी पारायण प्रत, २ सार्थ ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रशालेस सुपूर्द करण्यात आले.

यावेळेस मनोगतातून अजित वडगावकर, प्रकाश काळे, ह. भ. प. नरहरी चौधरी, ह. भ. प. नरहरी सांगळे यांनी या उपक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांना, पालकांना, शाळेला कसा होतो हे उदाहरणास समजावून सांगितले. अध्यक्ष भाषणात ह. भ. प. सुभाष महाराज गेठे यांनी ज्ञानज्योत इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये या उपक्रमाच्या माध्यमातून ज्ञानाची ज्योत खऱ्या अर्थाने प्रज्वलित झाली असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही असे सांगितले.

# मावळ तालुक्यातील मांस व मद्य विक्री २२ जानेवारी रोजी बंद ठेवा

## रवींद्र भेगडे यांची तहसीलदारांकडे मागणी

**वडगाव मावळ :** ायोध्या येथे निर्माणाधीन राम मंदिरात प्रभू श्रीराम यांच्या मूतीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी रोजी होत आहे. या पाश्वर्भूमीवर २२जानेवारी रोजी मावळ तालुक्यातील मांस व मद्य विक्री बंद ठेवावी, अशी मागणी मावळ भाजपा निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे यांनी केली आहे.रवींद्र भेगडे यांनी याबाबत तहसीलदार विक्रम देशमुख यांना निवेदन दिले आहे. यावेळी तालुकाध्यक्ष दत्ता गुंड उपस्थित होते.

२२जानेवारी २०२४ रोजी आयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराचा लोकार्पण सोहळा साजरा होत असून तब्बल ५०० वर्षानंतर प्रभू श्री राम मूती प्राणप्रतिष्ठा होत आहे. यानिमित्ताने सबंध देशामध्ये आनंदाचे उत्साहाचे वातावरण आहे.



प्रभू श्री राम हे हिंदू धर्माचे श्रध्दास्थान आहेत.त्यामुळे या ऐतिहासिक सोहळ्यानिमित्त संपूर्ण देशभरामध्ये दिवाळी साजरी केली जाणार असून मावळ तालुक्यात देखील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरा केला जाणार आहे.

यानिमित्ताने सर्व समाज बांधवांमध्ये शांतता,एकोपा व सामाजिक संदेश जावा यासाठी आपण मावळ तालुक्यातील सर्व मांस विक्री केंद्र बंद ठेऊन समस्त हिंदू बांधवांच्या भावनेचा आदर करावा अशी मागणी आज मावळ भाजपा निवडणूक प्रमुख रविंद्र भेगडे यांनी मावळचे तहसीलदार विक्रम देशमुख साहेब यांच्याकडे केली आहे. यावेळी त्यांच्या समवेत तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ गुंड उपस्थित होते.!

# शरद मोहोळ खून प्रकरणात गणेश मारणे मुख्य सूत्रधार

**पुणे :** गुंड शरद मोहोळ याचा करणारे विठ्ठल शेलार आणि गणेश मारणे हे दोन मुख्य सूत्रधार आहेत. शेलार आणि मारणे यांनी मोहोळचा खुनाचा कट रचल्याची माहिती गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी मंगळवारी न्यायालयात दिली. शरद मोहोळ खून प्रकरणात विठ्ठल महादेव शेलार (वय ३६), रामदास उर्फ वाघ्या नानासाहेब मारणे (वय ३६, दोघेही रा. मुळशी) यांना अटक करून प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. सी. बिराजदार यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. शेलार आणि मारणे यांना पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. सी. बिराजदार यांनी दिले. रा मुख्य मोहोळ खून प्रकरणाचा मुख्य सूत्रधार गणेश मारणे पसार झाला असून त्याच्या मागावर पोलिसांची पथके आहेत, अशी माहिती न्यायालयात देण्यात आली.

साहिल उर्फ मुन्ना पोळेकर आणि साथीदारांनी ५ जानेवारी रोजी मोहोळचा कोथरुडमधील सुतारदरा भागात पिस्तुलातून गोळ्या झाडून खून केला होता. याप्रकरणात आतापर्यंत १५ आरोपीना अटक करण्यात आली आहे, तसेच आठ ते नऊजणांना ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी करण्यात येत आहे.

मोहोळचा खूनापूवी विठ्ठल शेलार आणि गणेश मारणे यांची बैठक झाली होती. शेलारविरुद्ध खून, खंडणी, अपहरण असे गंभीर स्वरुपाचे१७ गुन्हे दाखल आहेत. वाघ्या मारणे सराइत गुन्हेगार आहे. शेलार आणि मारणे कोठे भेटले, त्यावेळी कोण उपस्थित होते, यादृष्टीने तपास करायचा आहे, असे तपासअधिकारी सहायक पोलीस आयुक्त सुनील तांबे यांनी सांगितले. शेलार आणि मारणे यांना सात दिवसांची पोलीस कोठडी देण्याची विनंती सरकारी वकील ॲड. नीलिमा इथापे-यादव यांनी केली. फिर्यादीच्या वतीने ॲड. गोपाळ भोसले यांनी बाजू मांडली. आरोपींच्या वतीने ॲड. डी. एस. भोईटे आणि लोक अभिरक्षक कार्यालयाच्या ॲड. रोहिणी लांघे यांनी बाजू मांडली. शेलारची पाश्वर्भूमी गुन्हेगारी असल्याने त्याला अटक करण्यात आली आहे. मोहोळच्या खुनानंतर शेलारला पोलिसांनी चौकशीसाठी बोलाविले होते. त्यावेळी शेलार चौकशीसाठी हजर झाला होता. या गुन्हयात मोक्का कारवाई करण्याची असल्याने शेलारला आरोपी करण्यात आले आहे, असे ॲड. भोईटे यांनी युक्तीवादात सांगितले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून न्यायालयने शेलार आणि मारणे यांना पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.




# श्रीराम मंदिर उद्घाटनाच्या पाश्वभूमीवर ठाण्यातही निघणार श्रीराम मंदिर प्रतिकृतीची मिरवणूक

## शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के

**ठाणे :** सुमारे ५०० वर्षाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अयोध्येमध्ये श्रीराम मंदिर साकारले गेले आहे. या मंदिरातील श्रीराम मूती प्राणप्रतिष्ठेचा मंगलमय सोहळा भव्य दिव्य स्वरुपात 22 जानेवारी २०२४ रोजी देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते होणार आहे. या पाश्वर्भूमीवर संपूर्ण देशभर उत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून ठाण्यातही २० जानेवारी २०२४ श्रीराम मंदिर प्रतिकृती, मिरवणूक सोहळा, मासुंदा तलाव येथे महाआरती व दिपोत्सव तसेच लेझर शो च्या माध्यमातून संपूर्ण श्रीराम चरित्र उलगडले जाणार आहे. हा संपूर्ण कार्यक्रम ठाणेकरांसाठी शिवसेनेच्या माध्यमातून भव्य स्वरुपात राबविला जात आहे, यामध्ये ठाणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले आहे.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पाहिलेले स्वप्न आणि करोडो रामभक्तांची इच्छा श्रीराम मंदिराच्या माध्यमातून प्रत्यक्ष साकार होत आहे याचा आनंद प्रत्येक हिंदू माणसाला आहे. गेल्या अनेक दिवसापासून देशाच्या विविध भागात अनेक कार्यक्रम सुरू आहेत. प्रत्येकाच्या मनामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. संपूर्ण देश राममय झाला आहे. धमवीर आनंद दिघेसाहेब यांच्या नेतृत्वाखाली ठाण्यात देखील श्रीराम मंदिर व्हावे यासाठी अनेकदा आंदोलने करण्यात आली तर मंदिराच्या पायाभरणीसाठी चांदीची वीट देखील ठाण्यातून पाठविण्यात आली होती, ही बाब प्रत्येक ठाणेकराच्या दृष्टीने अभिमानाची आहे.

ठाण्यात देखील अयोध्योत होणारा सोहळा अनुभवता यावा यासाठी विविध कार्यक्रम होत आहेतच, शिवसेनेच्या माध्यमातून शनिवार दिनांक 20 जानेवारी 2024 रोजी शिवसेना मुख्यनेते व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदेसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सायं. 5.00 वा. श्री कौपिनेश्वर मंदिर ते मासुंदा तलावपर्यत श्रीराम मंदिर प्रतिकृतीची भव्य मिरवणूक तद्नंतर

दिपोत्सव व मासुंदा तलाव येथे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या हस्ते प्रभू रामचंद्राची महाआरती काशी विश्वेश्वर येथील महंतांच्या सहयोगाने संपन्न होणार आहे. तसेच ठाण्याच्या विविध भागामध्ये सुशोभिकरण व विद्युत रोषणाई देखील भव्य स्वरुपात करण्यात येणार असून मासुंदा तलाव येथे लेझर शो च्या माध्यमातून श्रीराम चरित्र उलगडण्यात येणार आहे.

मासुंदा तलावावर तरंगत्या रंगमंच व लेझर शो

मासुंदा तलावावर तरंगता रंगमंच उभारण्यात येणार असून या ठिकाणी श्रीराम गीतांचा कार्यक्रम तसेच प्रभू रामचंद्राच्या जीवनावर आधारित नृत्यनाटिका सादर केली जाणार आहे. लेझर शोच्या माध्यमातून श्रीरामांचा इतिहास उलगडला जाणार आहे. त्याचबरोबर आकर्षक व नेत्रदिपक अशी फटाक्यांची आतिषबाजी देखील केली जाणार आहे.

हा एक उत्सवच साजरा होत असून यात ऐतिहासिक अविस्मरणीय क्षणाचे आपणही साक्षीदार व्हावे अशी आमची इच्छा आहे. यामध्ये ठाण्यातील सर्व भाषिक नागरिक पारंपारिक वेशभूषेत सहभागी होवून या सोहळ्याची शोभा वाढविणार आहेत. ही मिरवणूक प्रेक्षणीय असणार असून यामध्ये विविध साहसी कला सादर केल्या जाणार आहे. या मिरवणुकीत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रविंद्र फाटक सहभागी होणार आहेत. सर्वचजण या उत्सवाच्या तयारीला लागले असून एक भक्तीमय वातावरण ठाणे शहरात निर्माण झाले आहे. या आनंद सोहळ्यात प्रत्येक ठाणेकर नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन नरेश म्हस्के यांनी केले आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना ठाणे जिल्हा महिला संघटक सौ. मिनाक्षी शिंदे, सौ .लता पाटील शिवसेना ठाणे उपजिल्हाप्रमुख रमेश वैती, शिवसेना ठाणे शहर संघटक अशोक वैती, ठाणे शहर विधानसभा क्षेत्र संघटक हेमंत पवार, कोपरी पाचपाखाडी विधानसभा शहरप्रमुख राम रेपाळे, ओवळा माजिवडा विधानसभा शहर प्रमुख राजेंद्र फाटक हे विशेष परिश्रम घेत असल्याचेही श्री. नरेश म्हस्के यांनी नमूद केले.